

RNI - Regd No. 35688 / 20-11-1979
सवलतीच्या दरात पाठविण्याचा पोस्ट परवाना – Regd. NSK / 231 / 2012-2014
सदर अंक दर महिन्याच्या १० तारखेस नाशिक G.P.O. येथे पोस्टींग केला जातो.

किंमत १ रुपया

अग्रतश्चतुरो वेदाः पृष्ठतः सशरं धनुः ।
इदं ब्राह्ममिदं क्षात्रं शापादपि शरादपि ।।

# चित्तपावन मित्र

वर्ष ३५ वे अंक ७ वा १० सप्टेंबर २०१४

## श्री महालक्ष्मी पूजन

नवरात्र उत्सवामध्ये अष्टमीला होणारा श्री महालक्ष्मी पूजनाचा कार्यक्रम अश्विन शुद्ध सप्तमीस बुधवार दिनांक १ ऑक्टोबर २०१४ रोजी आयोजित केला आहे. तरी सर्व सभासदांनी दर्शनाचा लाभ घ्यावा.

महालक्ष्मी पुजार्थिंनी आपली नावे गद्रे मंगल कार्यालयात २७ सप्टेंबर २०१४ पर्यंत नोंदवावीत.

**पूजेची वेळ : सकाळी १० वाजता**

**● प्रसाद शुल्क : १००/- रुपये ●**

पुजार्थी महिलांनी कार्यालयात वेळेवर उपस्थित रहावे.

**महालक्ष्मी पूजनासाठी आणावयाचे साहित्य :–** हळद, कुंकू, ताम्हण, पळी, भांडे, निरांजन, बुक्का, अष्टगंध, गुलाल, उगाळलेले गंध, कापूर, उदबत्ती, काडेपेटी, विड्याची पाने–१०, सुपाऱ्या–१०, खारीक–५, बदाम–५, फळे–५ प्रकारची, सुटे पैसे, नारळ, फुले, दुर्वा, तुळशी, गूळ, खोबरे, जानवे, कापसाचे वस्त्र, अक्षता, अत्तर, काजळ डबी, बसण्यासाठी आसन, व्रत उद्यापनासाठी वायनदान (ओटी), मणी, मंगळसूत्र, फणी, सुपली, खण, बांगड्या इत्यादी, दुर्वांचा तातू (शक्यतो आणावा).

**टिप :–** दुर्वांचा तातू, रेशमाचा तातू व पंचामृत कार्यालयातून मिळेल.

**पूजेसाठी लागणारी पत्री :–** आघाडा, दुर्वा (दोन जुड्या), धोतरा, बेल, चाफा, शेवंती, केवडा, आंबा, बोर, बकुळ, प्राजक्त, तुळस, मालती, अशोक, हादगा, माका, शमी, रूई इत्यादी पाने पत्री म्हणून आणावीत.

**सूचना :–** संध्याकाळी होणाऱ्या देवीच्या पूजेचे साहित्य, साडी, मुखवट्यासाठी तांदूळ, प्रसाद इत्यादीसाठी, देणग्या देऊ इच्छिणाऱ्यांनी गद्रे मंगल कार्यालयात रोख रक्कम देऊन पावती घ्यावी. जमणाऱ्या निधीतूनच संस्थेमार्फत त्याचा विनियोग केला जाईल.

# चित्तपावन उद्योग मंचाचा सहावा वर्धापन दिन

चित्तपावन उद्योग मंचाचा सहावा वर्धापन दिन दरवर्षी प्रमाणेच अत्यंत दिमाखदारपणे पार पडला. श्री. प्रकाश भिडे यांच्या ईशस्तवनाने कार्यक्रमाची सुरूवात झाली. दीपप्रज्वलन झाल्यावर श्री. विजय साने, अध्यक्ष चित्तपावन संघ, नासिक यांनी संघाच्या गेल्या ८० वर्षाच्या कार्याचा आढावा घेतला. सभासदांना वैद्यकीय, शैक्षणिक इत्यादी अनेक प्रकारची मदत संघ करीत असून, संघ अत्यंत जोमाने कार्य करीत असल्याची माहिती त्यांनी दिली. यानंतर श्री. देवेंद्र बापट यांनी गेल्या सहा वर्षात उद्योजक मंचाने केलेल्या कामाचा आढावा घेतला. १९३५ सालीसुद्धा अशा तऱ्हेचा मंच त्या काळच्या द्रष्ट्या मंडळीनी स्थापन केला होता, असे कागदपत्र सापडल्याचे त्यांनी आवर्जून नमूद केले. तरुण उद्योजकांना उद्योगासाठी उद्युक्त करण्यासाठी व इतर सभासदांना व्यवसाय वृद्धीसाठी एकमेकातील सुसंवाद वाढवण्यासाठी मंच करीत असलेले प्रयत्न याची माहिती दिली.

कार्यक्रमाच्या प्रथम सत्रात अर्थतज्ञ डॉ. अजित रानडे यांनी येत्या काही वर्षात घडणाऱ्या आर्थिक घडामोडी व त्याचे उद्योजकतेवर होणारे परिणाम या विषयावर आपले विचार मांडले. या संदर्भात बोलताना त्यांनी सांगितले की, लघु आणि मध्यम उद्योग हाच उद्योग जगताचा कणा आहे. ५०% उत्पादन आणि रोजगार निर्मिती याच उद्योगांमधून होत असते. वाढती महागाई ही आपली आजची समस्या आहे, तरी जगातील लॅटिन अमेरिका, ब्राझिल, झिम्बाब्वे इ. सारख्या इतर विकसनशील देशासारखी ती भयानक नाही. जपान किंवा युरोपीय देशात अतिशय कमी व्याज दर आहेत एव्हढेच नव्हे तर तिथे बँकेत पैसा ठेवण्याबद्दलही पैसे आकारले जातात, अशी स्थिती आपल्याकडे नाही. अमेरिकेतही व्याज दर कमी असल्याने परकीय लोक आपल्याकडे ठेवी देण्यास उत्सुक आहेत. सध्या आपल्याकडे मागणी शून्य दरावर आली आहे याचा अर्थ ती मागील वर्षाएव्हढीच राहिली आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे कामगारांची संख्या वाढत आहे त्या मानाने उत्पादनात वाढ झालेली नाही. तसेच सरकारला दरवर्षी वित्तीय तूट येते त्यामुळे पुन्हा नवे कर्ज, हे चक्र वाढतच जाते. त्यामुळेच महागाई, विकासाचा शून्य दर व वित्तीय तूट ही तीन महत्त्वाची आव्हाने नव्या सरकारपुढे आहेत. त्यामुळे जास्त गुंतवणूक कशी होईल याकडे लक्ष देण्याचा प्रयत्न सरकार करीत आहे. पण त्याला यश येण्यासाठी काही काळ जाणे आवश्यक आहे. डॉ. रानडे यांनी उपस्थितांच्या प्रश्नांना समर्पक उत्तरे देऊन हे सत्र संपवले.

दुसऱ्या सत्रात श्री. गिरीश टिळक आणि निर्माण ग्रुपचे डॉ. अजित मराठे यांनी नेटवर्कींग, त्याचे महत्त्व आणि उपयोग याचा परिचय फार सुंदर रितीने करून दिला. श्री. टिळक म्हणाले – वेदापासून दासबोधापर्यंत नेटवर्किंग हा विषय हाताळला गेला आहे. अगदी चावडी पासून लग्न समारंभापर्यंत एकत्र येण्याचे प्रसंग म्हणजे नेटवर्किंग – माणसांची साखळी, माणसांचा एकमेकांशी संवाद, एकमेकांचा संपर्क म्हणजे नेटवर्किंग अथवा नेटवर्क.

**● भोंडला कार्यक्रम ●**

शनिवार दि. २७/९/२०१४ रोजी
सायंकाळी ठिक ५ वा.
ठिकाण : काका गद्रे मंगल कार्यालय

**●छंद वर्ग ●**

महिला मंडळाचा छंद वर्ग कार्यक्रम
रविवार दि. २८/९/२०१४ रोजी दु. ४ ते ६
ठिकाण : काका गद्रे मंगल कार्यालय

कोणत्याही व्यवसायासाठी ग्राहक आणि विक्रेता असावाच लागतो. त्यामुळे कोणत्याही व्यवसायात नेटवर्क लागतेच. आपले माणसांचे जाळे जेवढे मोठे तेवढीच आपली व्यवसाय वृद्धीची शक्यता अधिक. त्यामुळे your network is your networth असे म्हणावे लागेल. डॉ. मराठे यांनी व्यवसाय वाढीसाठी आवश्यक असलेल्या काही महत्त्वपूर्ण गोष्टी सांगितल्या. ते म्हणाले – संभाषण कौशल्य, भांडवल, मनुष्यबळ याचबरोबर सतत जागरूक असणे, संधीचा फायदा करून घेणे, एकमेकांबद्दल विश्वास असणे, बहुश्रुत असणे, माहिती व तंत्रज्ञान यांचे अद्ययावत ज्ञान असणे या सर्व गोष्टी महत्त्वाच्या आहेत. या सर्वच गोष्टी नेटवर्किंगच्या माध्यमातून साध्य करता येतात.

या नंतरच्या सत्रात, पुण्याच्या शोगिनी टेक्नो आर्टचे श्री. आठवले आणि क्रेन उत्पादक श्री. तुषार मेहंदळे यांनी भाग घेतला. या दोघांना बोलतं करण्याचे काम श्री. सुधीर जोगळेकर आणि श्री. अजित मराठे यांनी केले.

साधे ड्राफ्टस्मन असलेले श्री. आठवले आज आशियातील एक सर्वात मोठे प्रिंटेड सर्किट बोर्ड उत्पादक आहेत. गेल्या तीस वर्षातील त्यांची वाटचाल ऐकताना थक्क व्हायला होते. कठोर परिश्रम, जिद्द, कामावरची श्रद्धा या गुणांनीच मी इथपर्यंत आलो असे श्री. आठवले नम्रपणे सांगत होते. छोट्याशा खोलीत सुरू केलेला त्यांचा व्यवसय आज अनेक एकरांवर उभ्या असलेल्या भव्य जागेत चालतो आणि ११०० कामगार त्यांच्याकडे काम करतात. श्री. तुषार मेहेंदळे हे दुसऱ्या पिढीतील उद्योजक आहेत. अमेरिकेत उच्च शिक्षण घेतले तरी भारतात येऊन वडिलांचा अथवा दुसरा व्यवसायच करायचा हे त्यांनी पहिल्यापासूनच ठरवले होते. पण वडिलांच्या आकस्मिक मृत्यूमुळे अखेर त्यांनी त्याच व्यवसायाची धुरा सांभाळली. गेल्या १४ वर्षात दस पटींनी व्यवसाय वाढवला. सध्या ते वर्षाला ६५० ते ७०० विविध प्रकारच्या क्रेन्सचे उत्पादन करतात. ज्या तरुणांकडे काम करण्याची इच्छा आणि धडाडी आहे अशांना घेऊन मी कंपनीचा व्याप इतका वाढवला आहे असे ते म्हणाले. अशा तरुणांवर जबाबदारी टाकून त्यांना योग्य प्रशिक्षण देऊन मी या स्थानावर आहे हे त्यांनी आवर्जून सांगितले.

शेवटच्या सत्रात औरंगाबादच्या सौ. मोहिनी केळकर व पुण्याच्या सौ. अश्विनी देशपांडे यांनी भाग घेतला. सौ. केळकर स्वतः इंजिनियर असून आपल्या पतीबरोबर आपल्या व्यवसायाची धुरा सांभाळतात. डीबरिंग, मेटल फिनिशिंगसाठी लागणारी मशिन्स त्या बनवतात. सुरुवातीच्या काळात अनेक चुकाही झाल्या पण त्या चुकांची दुरुस्ती करत करतच व्यवसायात नवीन नवीन


## आयुर्विमा व आर्थिक सुरक्षितता

- आपला आयुर्विमा आहे का ?
- असल्यास तो **पुरेसा** आहे का ?
- आपला विमा **महागडा** आहे का ?
- आपला विमा व गुंतवणूक यांची गल्लत झाली आहे का ?
- आपणांस **कमी हप्त्यांत (प्रिमियम) पुरेसे विमा संरक्षण** कसे मिळवावे हे जाणून घ्यायचे आहे का ?
- आपणांस योग्य, निर्धोक व लाभदायक गुंतवणूक योजनांबद्दल जाणून घ्यायचे आहे का ?

*जर आपले उत्तर 'हो' असेल तर खालील फोनवर संपर्क करा.*

**मोबा. 8928119716**

**लॅण्डलाईन : 2335546**

**अशोक घैसास,** नाशिक-१०.

**प्रत्येक कमावत्या व्यक्तीला पुरेसे विमा संरक्षण असायला हवे.**

तंत्रज्ञान आणून नवीन नवीन मशिन ग्राहकांच्या मागणीनुसार बनवत आज त्या आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत स्थिरावल्या आहेत. या सर्व वेळी घरच्या लोकांनी आर्थिक आणि मानसिक आधार दिला, याचा त्यांनी आवर्जून उल्लेख केला. सौ. अश्विनी देशपांडे म्हणाल्या की त्यांचा व्यवसाय हा वेगळ्या प्रकारचा व्यवसाय आहे. कोणत्याही व्यवसायाचे branding, त्याचे डिझायनिंग अशी कामे म्हणजे कल्पकतेने करायची कामे असतात. अजूनही या तऱ्हेची कामे करण्याचा व्यवसाय आपल्या देशात बाल्यावस्थेत आहे. पण येणाऱ्या काळात त्याचे महत्त्व वाढत जाणार आहे. कोणत्याही व्यवसायाचे पहिल्या दिवशीच branding होणे महत्त्वाचे असते. तुमची भविष्यातील स्वप्ने तुमच्या व्यवसायाबद्दलच्या कल्पना हे सर्व त्यातून स्पष्ट होते. या दोन्ही उद्योजिका जागतिक स्तरावर काम करीत असल्याने परदेशी ग्राहकाशी व्यवहार करताना लागणारा काटेकोरपणा, कामाचा दर्जा, कामाचे नियम या सगळ्या गोष्टी कटाक्षाने जपाव्या लागतात हे प्रत्येक उद्योजकाने लक्षात ठेवले पाहिजे असे त्यांनी मुद्दाम सांगितले. स्त्री मध्ये उपजत असलेली मल्टी टास्किंगची क्षमता आणि विश्वासार्हता या दोन्हीमुळे स्त्री यशस्वी होऊ शकते असेही त्या म्हणाल्या. कोणत्याही कामात तुमचे मन गुंतवले तरच समाधान मिळते आणि यशस्विताही. म्हणून प्रत्येकाने आपल्याला आवडेल अशा तऱ्हेचा व्यवसाय करावा असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाची सांगता नेहमीप्रमाणे सौ. धनलक्ष्मी पटवर्धन हिच्या वंदेमातरम्ने झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तृप्ती साठे आणि दिपाली पटवर्धन ह्यांनी केले.



**गणेशोत्सव :– गद्रे मंगल कार्यालयात श्रीं ची प्रतिष्ठापना करताना श्री. हेरंब घारपुरे**

# चित्तपावन महिला मंडळ (स्नेहबंध मैत्रिणींचा)



बरसल्या श्रावण संगीत सरी.... ! ता. २२ ऑगस्ट शुक्रवारी काका गद्रे कार्यालयात चित्तपावन महिला मंडळ (स्नेहबंध मैत्रिणींचा) तर्फे संगीताचा सुश्राव्य कार्यक्रम संपन्न झाला. ह्या कार्यक्रमात प्रमुख गायिका अन्य कुणी नसून आपल्याच मंडळाच्या सदस्य मैत्रिणी होत्या. मासिक सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार एखादा कार्यक्रम आपल्यातील कलाकारांनी सादर करावा असे ठरले व त्याला मूर्त स्वरूप देण्यात आले.

आवाज छान असणाऱ्या, संगीताची जाण असलेल्या शाळा, कॉलेजमध्ये गाणे गायलेल्या काही मैत्रिणींनी गीता बर्वे यांच्या सहकार्याने काही गीतांचा सराव केला. गेल्या आठवड्यात अनेक वेळा त्या भेटल्या, कार्यक्रमाचे योग्य नियोजन केले, गीतांचा व निवेदनाचा सराव केला आणि ह्या कार्यक्रमात छान गीते सादर केली.

श्रावण गीतांचा कार्यक्रम असल्याने ह्या कार्यक्रमास पावसाची हजेरी होतीच !.... तरीही अनेक सदस्य, मैत्रिणी आवर्जून उपस्थित होत्या. सर्वांनी गीतांना मनःपूर्वक दाद दिली. ह्या प्रसंगी वासंती फाळके, ऐश्वर्या साने, चित्रा जोशी, स्मिता रानडे, आश्विनी दामले, विशाखा मोडक, प्रिती मोडक, कांचन भागवत आणि गीता बर्वे ह्या मैत्रिणींनी सुरेल गीते गायली आणि माधवी जोगळेकर यांनी निवेदन केले व श्री. सोनवणे हे तबल्यावर साथीला होते.

मैथिली गोखले यांनी प्रास्ताविक केले. मंगला जोगळेकर यांनी गीता बर्वे यांचा परिचय करून दिला. रेखाताई फडके यांनी पुष्पगुच्छ देऊन कलाकारांचे कौतुक केले.

ह्या दिवशी श्रावणी शुक्रवार असल्याने हळदीकुंकवाचा समारंभ सुद्धा आनंदाने पार पडला. सर्वांनी फुटाणे आणि दुधाचा आस्वाद घेतला.

**– मैथिली गोखले**
(कार्यकारिणी सदस्य)

---

# चित्तपावन ज्येष्ठ नागरिक मंचाची प्राथमिक सभा संपन्न

चित्तपावन ज्येष्ठ नागरिक मंचाची प्राथमिक सभा दि. १५–८–२०१४ रोजी काका गद्रे मंगल कार्यालयात दु. ४.३० वा. संपन्न झाली. पुढची सभा १८–९–२०१४ रोजी दु. ४.३० वा. गद्रे मंगल कार्यालयात होईल. यावेळी आपणास विनंती आहे की आपण आपल्याबरोबर चित्तपावन ज्येष्ठ नागरिकांना (पुरुष ५५ वर्षावरील व महिला ५० वर्षावरील) सभेस घेऊन यावे ही विनंती. या सभेत आपण काय करू शकतो, फेस्कॉम, आयस्कॉन, प्रादेशिक विभागामार्फत ज्येष्ठ नागरिक काय कामे करीत आहेत, इ. चे महत्त्व समजावून सांगण्यात येईल. तरी आपण मोठ्या संख्येने या मंचात सामील व्हावे ही विनंती.

संपर्क – डॉ. कृ. भा. आपटे : (०२५३) २५७३६९२, मो. ९४०३५५६४६४

# नाशिकरोड चित्तपावन ब्राह्मण संघातर्फे लोकमान्य टिळक पुण्यतिथी साजरी

नाशिकरोड चित्तपावन ब्राह्मण संघातर्फे मागील २ वर्षापासून लोकमान्य टिळक पुण्यतिथीनिमित्त नाशिकरोडच्या देवी चौकातील लोकमान्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून त्यांचे स्मरण करण्यात येते. याही वर्षी दि. १ ऑगस्ट २०१४ रोजी सकाळी ७.१५ वा. आपल्या सभासदांनी तेथे जमून लोकमान्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण केला. श्री. जगदीश गोडबोले यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला व त्या प्रसंगी त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तसेच श्री. भास्कर चितळे यांनी टिळकांच्या काही आठवणी सांगितल्या. सर्वश्री अमेय चितळे, देवधर सर, दीप देवधर व यश देवधर, आशुतोष गोखले, कांचन गोवंडे, भास्कर मेहेंदळे, उदय गाडगीळ, खाजगीवाले, मोडक हे सर्व सभासद या प्रसंगी हजर होते.

# नाशिकरोड चित्तपावन ब्राह्मण संघातर्फे रक्तदान शिबीर

चित्तपावन ब्राह्मण संघ नाशिकरोड शाखेतर्फे दरवर्षी जनकल्याण रक्तपेढीच्या मार्गदर्शनाखाली व सहकार्याने लोकमान्य टिळक पुण्यतिथी निमित्ताने रक्तदान शिबीर घेण्यात येते. याही वर्षी रक्तदान शिबीर रविवार दि. ३ ऑगस्ट २०१४ रोजी श्री गणपती मंदिर हॉल, एम.एस.ई.बी. कॉलनी, शिवाजीनगर, जेलरोड येथे घेण्यात आले.

आपल्या शाखेचे श्री. अमेय चितळे व रक्तपेढीचे डॉ. राठी यांच्या हस्ते श्री परशुराम व लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दीप प्रज्वलन करण्यात आले. अथर्वशीर्ष पठणानंतर शिबिरास सुरुवात झाली. डॉ. राठी यांच्या मार्गदर्शनाखाली एकूण २२ जणांनी रक्तदान केले. रक्तपेढीच्या डॉ. राठी, सौ. ज्योती सरोदे, सौ. वर्षा पिंगळे, सौ. विजया मावळे व श्री. कैलास पेखळे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. आपल्या मंडळाच्या सभासदांनीही मोलाचे सहकार्य केले.

फक्त उच्चशिक्षित ब्राह्मण स्थळांकरिता २५ वर्षांची विश्वसनीय विवाह संस्था

आता घर बसल्या वेबसाईटवर स्थळे बघा • ३५००+ स्थळे
कुंडली व प्रोफाईल मॅचिंग • प्रोफाईल हायलायटींग
एक्सप्रेस इंटरेस्ट • पालकांसाठी सोपी वेबसाईट

|| ShubhaVishva ||
जुळवी नाते जन्माचे

६९६, नारायण पेठ, कुंटे चौक, पी. एन्. गाडगीळ ज्वेलर्सच्या वर, लक्ष्मी रोड, पुणे ४११०३०
फोन : (०२०) २४४५७०७० / २४४९५००७
वेळ : सकाळी ११ ते सायं ७ (सोमवारी बंद)

www.shubhavishva.co.in

# चित्तपावन ब्राह्मण संघ - वर यादी

| अ.नं. | नाव, पत्ता व फोन | जन्मतारीख | गोत्र | उंची | शिक्षण | उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|---|
| १२१ | श्रीकांत प्रभाकर कुलकर्णी<br>२, रघुकुल श्री सेवा सोसायटी, नवीन औरंगाबाद रोड, पंचवटी, नाशिक-३. फोन : ०२५३-२५१६४६१, मो. ९७६५५५९६४२ | २२-५-७३ | वशिष्ठ | ५.८ | एम.एस्सी., डीबीएम एम.एम.एस., डी.एम.ई | ३५,००० (मासिक) |
| १२२ | संदीप बळवंत भिडे<br>नवकार प्लाझा, धुळे रोड, अंमळनेर, जि. जळगाव-४२५४०१ | ११-११-८६ | नित्युंदन | ५.६ | बी.कॉम., पी.जी.डी.बी.एम. | ४२,००० (मासिक) |
| १२३ | निनाद पटवर्धन<br>सी-१३, गोविंदा अपार्टमेंट, रामेश्वर नगर, आनंदवल्ली, पाईपलाईन जवळ, गंगापूर रोड, नाशिक-४२२ ०१३.<br>मो. ९९२३२९२३५०, ९७६६२८२९४० | ३०-११-८३ | कौंडिण्य | ६.४ | बी.ई. (इले.) | १,००,००० (मासिक) |
| १२४ | ओमकार किशोर घैसास<br>'क्यू', ३०४, मयुर नगरी, फेज २, पिंपळे गुरव, जि. पुणे-६१.<br>फोन : -०२०-२७३०५२४७, मो. ८३०८३५७४४८ | १-२-८७ | भारद्वाज | ५.६ | बी.ए. (हॉटेल मॅनेजमेंट) | ३२,००० (मासिक) |
| १२५ | सलील सुभाष कोतेकर<br>अ-३, श्रीकला अपार्टमेंट, एकता चौक, राजीवनगर, नाशिक-९.<br>फोन : २३७९८७०, मो. ९९७५४९९९०३ | २१-९-८२ | वशिष्ठ | ५.११ | बी.ई. (कॉम्प्युटर) | (मासिक) |
| १२६ | राजेंद्र शिवाजीराव कुलकर्णी<br>७, साई संकल्प रो हाऊसेस, कला नगर, दिंडोरी रोड, उमा दर्शन सोसायटीजवळ, म्हसरुळ, नाशिक-४. मो. ९७६७५०९०४२ | २८-८-७७ | भार्गव | ५.९ | बी.ए. | (मासिक) |
| १२७ | पुष्कर मंगेश रानडे<br>३०१, ओलीव्हिया सोसा., उन्नती गार्डन, पोखरण रोड नं. १, देवदयानगर सोसा.समोर, पोखरण नं. १, ठाणे-४००६०६.<br>फोन : ०२२-२५८५७६०९ (सायं. ७ ते १०), मो. ८१०८७०९६५३ | १९-८-८५ | भारद्वाज | ५.८ | एम.ई. (सॉफ्टवेअर) (लंडन), सीएपी सर्टि. | (मासिक) |
| १२८ | श्रीकांत पद्माकर दामले<br>गणगोपी अपार्टमेंट, जी-बिल्डींग, ३ रा मजला, ब्लॉक नं. ३०४, जाखेडे पेट्रोल पम्पजवळ, जळगांव - ४२५००१.<br>फोन : ०२५७-२२३४६७९, मो. ९७६५८८७३३१ | १२-७-८० | शांडिल्य | ५.४ | बी.ए. | |
| १२९ | अजित पद्माकर दामले<br>गणगोपी अपार्टमेंट, जी-बिल्डींग, ३ रा मजला, ब्लॉक नं. ३०४, जाखेडे पेट्रोल पम्पजवळ, जळगांव - ४२५००१.<br>फोन : ०२५७-२२३४६७९, मो. ९७६५८८७३३१ | ७-११-७६ | शांडिल्य | ५.४ | एफ.वाय.बी.ए. | |

# चित्तपावन ब्राह्मण संघ - वधू यादी

| अ.नं. | नाव, पत्ता व फोन | जन्मतारीख | गोत्र | उंची | शिक्षण | उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|---|
| ३५ | स्वप्नजा विनोद मराठे<br>द्वारा विनोद अरूण मराठे, दै. हिंदुस्थान, खापर्डे बगिचा, अमरावती - ४४४६०२<br>फोन : ०७२१-२६६३६०८, मो. ९३७२८६३६०८ | १६-१२-८९ | कपि | ५.२ | बी.एस्सी., एम.जे. एम.सी. | १५००० (मासिक) |
| ४० | पूजा अरूण मुळे<br>१२, लिगसी अपार्ट, वैभव कॉलनी, स्प्लेंडर हॉल मागे, राजीवनगर, नाशिक-९. मो. ९२२५६२८७२८, ८६००२८७६१७ | २४-१०-९२ | भारद्वाज | ५.४ | एम.कॉम. | १५,००० (मासिक) |
| ४८ | रुचिरा आनंद गोरे<br>८/२, समर्थ कुटी, सोमवारी पेठ, विमा दवाखान्याजवळ, नागपूर<br>मो. ९९२२०९१०१९, ८८८८३९७२८९ | ९-४-९१ | गार्ग्य | ५.० | एम.ए., (संस्कृत) फर्स्ट क्लास बी.एड. | |
| ४९ | हेमा प्रमोद रानडे<br>एन ४१, व्ही.सी. १/११/११, सुभाषचंद्र बोस गार्डन जवळ, ४ थी योजना, सावतानगर, सिडको, नाशिक-४२२ ००८.<br>मो. ९०११४९५७४९ | १३-१०-८५ | भारद्वाज | ५.३ | बी.कॉम., एम.पी.एम. | ८,००० (मासिक) |
| ५० | डॉ. पूजा गणेश कुलकर्णी<br>५, अंकित रेसीडेन्सी हौ.सो. अष्टविनायक कॉलनी, लेन नं. ३, सावरकर नगर, गंगापूर रोड, नाशिक-४२२ ०१३.<br>फोन : ०२५३-२३४६६४३, मो. ९४२२७०४८८० | १८-४-८७ | पाराशर | ४.११ | एम.डी. ॲनेस्थेशिया | ४०,००० (मासिक) |
| ५१ | समज्ञा यशवंत वैशंपायन<br>३४, 'मान्सून' गजानन कॉलनी, मखमलाबाद रोड, पंचवटी, क्रांतीनगर बस स्टॉप जवळ, नाशिक-३. मो. ९४२०३०१६६२ | १०-१-८९ | नित्युंदन | ५.२ | एम.ए., बी.एड. | |
| ५२ | समता जयदेव कुऱ्हेकर<br>१२, दुर्गेश प्लाझा, रिलायन्स पेट्रोल पंपासमोर, दिंडोरी रोड, पंचवटी, नाशिक-४. मो. ८३८००१६४३४ | २३-१०-८३ | भारद्वाज | ५.१ | एम.एस्सी. (स्टॅट) | ७०,००० (मासिक) |
| ५३ | स्नेहल विजय अभ्यंकर<br>घ.नं. ३९५, हुडको कॉलनी, सावरकरनगर, मनमाड - ४२३१०४.<br>फोन : २५९१-२२५८७९, मो. ८४११८५४२९३ | १४-१२-९० | वशिष्ठ | ५.२ | एम.एस्सी. (कॉम्प्यु. सायन्स) | |
| ५४ | प्राची बाळकृष्ण जोशी<br>द्वारा - हरीभाऊ ठोसर यांचे घर, पाठक गल्ली, राम मंदिर रोड, बुलढाणा - ४४३००१. मो. ९८६०५८३६५५, ९४२३४४७७२९ | १४-११-९० | शांडिल्य | ५.१ | बी.ई. (आय.टी.) | ३०,००० (मासिक) |
| ५५ | आभा अनिल लिमये<br>२१, मॉडेल कॉलनी, एच.पी.टी. कॉलेज रोड, नाशिक-५.<br>मो. ९२२५१०७०८१ | १५-४-९० | कपी | ५.५ | एम.कॉम., बी.एड. संगीत विशारद | ३००० (मासिक) |


| अ.नं. | नाव, पत्ता व फोन | जन्मतारीख | गोत्र | उंची | शिक्षण | उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|---|
| ५६ | डॉ. अमृता उल्हास सहस्त्रबुद्धे<br>''समाधान'', ८२, महावीरनगर, कनाडिया रोड, इंदोर (म.प्र.)<br>इंदौर-४५२०१८. फोन. ०७३१-४२०७०६०, मो. ९८९३२६५९४३ | ४-१-८६ | शांडिल्य | ५.१ | एम.बी.बी.एस. | ३.६० लाख<br>(वार्षिक) |
| ५७ | हर्षदा चंद्रकांत कुलकर्णी<br>मु. पो. वडजी, ता. भडगांव, जि. जळगांव - ४२४१०५.<br>म.ो ९८६०८९७६७६ | १९-२-९० | जमदग्नी | ५.३ | बी.ए. | १५,००० (मासिक) |
| ५८ | रसिका सुधीर बर्वे<br>९६, बर्वे वाडा, मु.पो. पांढुर्ली (व्हाया भगूर), ता. सिन्नर,<br>जि. नाशिक - ४२२ ५०२. मो. ९६२३७३६५६१ | ३०-१-९० | कौशिक | ५.३ | एम.कॉम. | -- |
| ५९ | श्रुती शांताराम पळनीटकर<br>'वसंत विहार', वझर, ता. देगलूर, जि. नांदेड.<br>मो. ९५६१४२८९२६, ९९७५०७४०६८ | ७-४-९१ | शांडिल्य | ५.२ | एम.बी.ए. (एच.आर.) | -- |

## * अभिनंदन *



आपल्या संस्थेचे सदस्य श्री. नितीन श्रीकांत मुजुमदार यांची कन्या **कु. राधा नितीन मुजुमदार** हिने राष्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धेत सब-ज्युनियर गटात १५ वर्षाखालील मुलींमध्ये राष्ट्रीय रँकिंग प्राप्त केले. गोहत्ती (आसाम) व भागलपूर (बिहार) येथे झालेल्या राष्ट्रीय सब-ज्युनियर स्पर्धांमध्ये राधाने 'मेन ड्रॉ' मध्ये सहभागी होण्याचा मान मिळविला. राधा किलबील सेंट जोसेफ हायस्कूलमध्ये इयत्ता ९ वीत शिकत आहे.

* * *




आपल्या संस्थेचे सभासद श्री. संजय शंकर पेठे यांची मुलगी **कु. याज्ञसेनी संजय पेठे** ही सन २०१४ मध्ये झालेल्या शालान्त परीक्षेत सीबीएसई बोर्डातून ८६% गुण मिळवून उत्तीर्ण झालेली आहे. संस्थेतर्फे हार्दिक अभिनंदन !



**कु. सायली किशोर जोग** ही युनिव्हर्सिटी ऑफ पुणे ची बी.ई. (इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी) च्या परीक्षेत फर्स्ट क्लास विथ डिस्टिंक्शन गुणवत्ता प्राप्त करून उत्तीर्ण झाली. संस्थेतर्फे सायलीचे हार्दिक अभिनंदन व भावी वाटचालीस शुभेच्छा !

* * *



संस्थेच्या आजीव सदस्या सौ. सुवर्णा भूषण परांजपे यांचा मुलगा **चि. निनाद भूषण परांजपे** यास 'आयआयएम (इंडियन इन्स्टिटच्युट ऑफ मॅनेजमेंट), कोलकाता' येथे दोन वर्षाच्या पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन मॅनेजमेंट ह्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळाला आहे. त्याचे ९९.८७ इतके गुण होते. ह्याआधी त्याने आय.आय.टी. मद्रास येथून एम.टेक (मेटॅलॉजी) केले आहे. पुढील वाटचालीस संस्थेतर्फे हार्दिक शुभेच्छा !

*चित्तपावन ब्राह्मण संघातर्फे सर्वांना शुभेच्छा व हार्दिक अभिनंदन !*

# श्री परशुराम नागरी सहकारी पतसंस्था मर्या., नाशिक

गद्रे मंगल कार्यालय, नाशिक - ४२२ ००२. दूरध्वनी : २३१३७०९

रजि. नं. एन.एस.के./(एन.एस.के.) आर.एस.आर./सी.आर १५८७/९४

## • वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस •

श्री परशुराम नागरी सहकारी पतसंस्था मर्या., नाशिक या संस्थेच्या मान्यवर सभासद बंधू-भगिनींना कळविण्यात येते की, सन २०१३-२०१४ या आर्थिक वर्षाची २० वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दि. २०/९/२०१४ रोजी सकाळी ११ वाजता काका गद्रे मंगल कार्यालय, गोळे कॉलनी, नाशिक येथे संस्थेचे अध्यक्ष श्री. सुधीर दामले यांच्या अध्यक्षतेखाली बोलविण्यात आली असून त्यात खालील विषयांवर विचारविनिमय करून निर्णय घेण्यात येणार आहेत. तरी आपण वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

### • सभेपुढील विषय •

१) दि. ७/९/२०१३ रोजी झालेल्या वार्षिक सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

२) दि. ३१/३/२०१४ अखेर संपलेल्या वर्षाचा अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रक वाचून मंजूर करणे.

३) संचालक मंडळाने शिफारस केल्याप्रमाणे नफा वाटणीस मंजुरी देणे.

४) सन २०१३-२०१४ च्या अंदाज पत्रकापेक्षा कमी-अधिक झालेल्या खर्चाची नोंद घेऊन जादा झालेल्या खर्चास मंजुरी देणे व सन २०१४-२०१५ या वर्षाकरिता संचालक मंडळाने शिफारस केलेल्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे.

५) सन २०१३-२०१४ या वर्षाच्या सहकारी तपासणी अहवालाची वाचून नोंद घेणे.

६) थकबाकीदार सभासदांची कर्जवसुली करण्याबाबत विचार करून निर्णय घेणे.

७) सन २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी संस्थेच्या हिशोब तपासणीसाठी लेखा परीक्षकाची नेमणूक करण्याबाबत.

८) मा. अध्यक्षांच्या पूर्व परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांवर विचार करणे.

ता. ३०/८/२०१४

संचालक मंडळाच्या आदेशावरून

**श्री. अभय खरे**

मानद सेक्रेटरी

### • सभासदांना नम्र निवेदन •

१) कोरमअभावी सभा तहकूब झाल्यास सदरची सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने सुरू करण्यात येईल. अशा सभेस कोरमची आवश्यकता राहणार नाही.

२) संस्थेचा सन २०१३-२०१४ अखेरचा तपासणी अहवाल कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत संस्थेच्या प्रशासकीय कार्यालयात पाहावयास मिळेल.

३) संस्थेच्या कामकाजाबाबत आपल्या काही सूचना असल्यास त्या लेखी स्वरुपात सोमवार दि. १५/९/२०१४ पावेतो संस्थेच्या प्रशासकीय कार्यालयात आणून द्याव्यात अथवा पोस्टाने वेळेत पाठवाव्यात.


अद्ययावत वैद्यकिय सेवा देणारे
जागतिक दर्जाचे हॉस्पिटल!
Sahyadri
Hospitals
Sahyadri Speciality Hospital Nashik
सह्याद्रि स्पेशालिटी हॉस्पिटल नाशिक
सह्याद्रि हॉस्पिटलची ठळक वैशिष्ट्ये
• २ एकर परिसरात विस्तारलेले भव्य हॉस्पिटल • अनुभवी डॉक्टर्स व स्टाफ • विविध स्पेशालिटी व सुपर स्पेशालिटी वैद्यकिय सेवा उपलब्ध • २४ तास फार्मसी
उपलब्ध सुपर स्पेशालिटी सेवा:
उपलब्ध अद्ययावत सुविधा:
उपलब्ध स्पेशालिटी सेवा:
महाराष्ट्रातील सर्वात मोठी हॉस्पिटलची शृंखला:
सह्याद्रि स्पेशालिटी हॉस्पिटल नाशिक
मुंबई–आग्रा रोड, द्वारका सर्कल जवळ, वडाळा रोड, नाशिक – 422001
संपर्क: 0253-6691 666 • आपत्कालीन वैद्यकिय सेवा: 88888 22222 • www.sahyadrihospital.com

निवासी, व्यापारी, औद्योगिक संकुल बांधकाम,
प्लॉट डेव्हलपमेंट यातील
विश्वसनीय नाव

# मिहिर कन्स्ट्रक्शन

## सिव्हिल कॉन्ट्रॅक्टर

**ऑफिस** : २, प्रसाद रेसिडेन्सी, माणेक्शा नगर, रत्नपारखी हॉस्पिटलजवळ, द्वारका, नाशिक. फोन : २५९०७५४
**ईमेल :** cvranade@gmail.com

**सी. व्ही. रानडे,** बी.ई. (सिव्हिल)
**मोबाईल : ०९४२२२४६८७८**

## नवरात्र अष्टमी स्टॉल

अष्टमीचा कार्यक्रम बुधवार दि. १ ऑक्टोबर २०१४ रोजी आहे. या दिवसासाठी स्टॉल बुकिंग सुरू आहे. स्टॉल मर्यादित असल्याने इच्छुक महिलांनी लवकरात लवकर काका गद्रे मंगल कार्यालयात संपर्क साधावा.

## लक्ष्मी केशव सारीखे

लक्ष्मी केशव सारीखे दैवत
असता माझ्या घरी ।
कसा वाहून जाऊ जगी
यात्रेतील त्या पुरी ।। धृ ।।

कपी कुलोत्पन्नी जनसमुदायी
श्रेष्ठ श्रेष्ठींच्या लहरी
काया वाचे मानसी जमती
होण्या दिव्य साक्षात्कारी ।। १ ।।

चित्तपावनी परशुरामे
जिव धरा निर्मिली
कोकणप्रांती भारतदेशी
किरीट रत्ने जडविली ।। २ ।।

हृदयी ध्येया वेदा जतनी
पाचा मुखी इशा पठणी
कोऽहं रुपांजरी सोऽहं वाणी
सूक्ष्म सूक्ष्मांच्या मनी ।। ३ ।।

**– श्री. वामन विनायक लिमये**

चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक या संस्थेचा हा अंक प्रकाशक, संपादक प्रा. दिलीप फडके यांनी मीरा एंटरप्राईजेस्, २, जयश्री अपार्टमेंट, ठाकरे बंगला, गंगापूर रोड, नाशिक–२ येथे छापून काका गद्रे मंगल कार्यालय, गोळेकॉलनी, नाशिक – ४२२००२ येथे प्रसिद्ध केला.
**फोन – चित्तपावन : २५०११०७, गद्रे मंगल कार्यालय : २५७६२४१**

प्रति, ____________________

____________________

____________________

**संस्थेची वेबसाईट :–**

- Website : www.nasikchitpavan.org
- Email ID : nasikchitpavan@gmail.com
- http:\\twitter.com\nasikchitpavan
- http:\\facebook.com\nasikchitpavan
- http:\\youtube.com\user\nasikchitpavan

या मासिकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. लेखातील सर्व मते व विचार हे सर्वस्वी त्या त्या लेखकांचे आहेत. जाहिरातदारांनी जाहिरातीत केलेल्या निवेदनाला संपादक जबाबदार नाहीत. ग्राहकांनी जाहिरातीतील उत्पादनांची व नमूद केलेल्या बाबींची प्रत्यक्ष पडताळणी करून पाहावी. चित्तपावन मित्र च्या मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादकांचा या गोष्टींशी काहीही संबंध नाही.